TIMES CITY

# State fares well in agri sector

## Policy On Model Contract Farming, Changes In Trade Laws On Cards

Tushar.Pawar@timesgroup.com



Niit Aayog member Ramesh Chand inaugurates the conference of Bombay Chamber of Commerce and Industry on Thursday

**Nashik:** NITI Aayog member Ramesh Chand on Thursday praised Maharashtra for doing well in marketing, contract-farming and innovation in the agriculture sector.

Chand said NITI (National Institution for Transforming India) Aayog has prepared a policy on model contract-farming to benefit farmers in different states. The policy will be presented within 15 days.

He was speaking at the 11th biennial conference of Bombay Chamber of Commerce & Industry on the topic 'Transforming agriculture through investments in agriculture value chain'.

Chand also hinted that there will be some serious changes in the trade policy of the country so that import and export related decisions to be done on the basis of criteria.

"The government has made a provision of Rs25,000 crore for the agriculture sector under Rashtriya Krishi Vikas Yojana. The Centre's share will be Rs15,000 crore and the rest will come from the states. The funds are to be spent during next three years in agricultural sector," said Chand and added, "Around 20% of the total funds are to be spent on developing value chains."

"Today, producing crops is not an issue. The problem is that farmers are not getting better prices for their crops. We need to work on this. There is still a traditional marketing system in the country and we will have to adopt a new marketing policy," he added.

"The government at the Centre had started economic reforms in 1991. But even now farmers are in a pathetic condition because market reforms did not happen in agricultural sector. Both centre and state governments did not pay attention to the interests of the agricultural sector, pushing the responsibilities on each other," Chand said. He stressed on the need for reforms in agricultural marketing to benefit the farmers.

"The centre introduced Model APMC Act in 2013, but its implementation was poor by the state governments. Some states did not even implement it. The Maharashtra state government introduced the private agricultural markets to provide an option to farmers after foods and vegetables were denotified from the APMC Act," he said.

Chand added, "The Union ministry of finance has set up a committee, chaired by me, to study the future of trading and find out whether price discovery of the crop in future is possible."

He also said there has been good investment in education in cities only. "The best universities are in the cities only because talents go where they get facilities. The wards of farmers should also go outside their villages to take education," he added.

# कृषी क्षेत्राच्या विकासासाठी नवउद्योजकांची गरज

## 'ॲग्रीकॉर्प' परिषदेत डॉ. रमेश चंद्र यांचे मत

प्रतिनिधी, नाशिक

देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात कृषी क्षेत्रास पोषक वातावरण असून 'व्हॅल्यू ऑफ चेन'ची गरज ओळखत त्या दृष्टीने विविध प्रयोग सुरू आहेत. जुन्या जाणत्या कृषी संस्थांनी पुढाकार घेणे, शेतीपूरक उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी सहभाग घेणे तसेच नवउद्योजकांनी कृषी क्षेत्राकडे वळणे या त्रिसूत्रीवर काम केल्यास कृषी क्षेत्राचा बदललेला चेहरा मोहरा पहावयास मिळेल, असे मत नीति आयोगाचे सभासद डॉ. रमेश चंद्र यांनी गुरुवारी व्यक्त केले. 'बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीज'च्या ११ व्या 'ॲग्रीकॉर्प' या द्वैवार्षिक परिषदेत ते बोलत होते.

परिषदेचे उद्घाटन डॉ. चंद्र यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. भारतीय शेती आणि अर्थव्यवस्था हे देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे घटक आहेत. आज देशासमोर शेती उत्पादन वाढविण्याऐवजी त्या उत्पादनाला योग्य भाव कसा मिळवून द्यायचा, असा प्रश्न आहे. यासाठी निती आयोग वेगवेगळ्या टप्प्यांवर काम करत आहे. देशात कृषि माल विकण्याच्या पध्दतीत बदल झाला पाहिजे. शेतकऱ्यांकडून ठेकेदार, ठेकेदाराकडून दलाल किंवा बाजार समिती या चक्राचा फायदा घाऊक-किरकोळ व्यापारी घेतात आणि शेती मालाच्या किमतीत अस्थिरता आणतात. बेरोजगारीची समस्या या क्षेत्रात जाणवत असून व्यवस्थेने रोजगार विषयक पर्याय देणे गरजेचे आहे. शेतकरी आपल्या प्रश्नांविषयी, अडचणींविषयी जागरूक नसून त्याबाबत दबाव गट तयार होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सूचित केले.

शेत मालास योग्य किमत मिळावी यासाठी कृषी क्षेत्राशी संबंधित 'एपीएमसी' कायद्यात बदल होणे गरजेचे आहे. महाराष्ट्राने कायद्यात काही बदल केल्यामुळे राज्य आज आघाडीवर असल्याचे चंद्रा यांनी सांगितले. जीएसटीला महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळाला. केंद्र सरकारने कृषी राष्ट्र विकास योजनेंतर्गत २५ हजार कोटींचा निधी पुढील तीन वर्षांसाठी मंजूर केला आहे. त्यातील २० टक्के रक्कम ही 'व्हॅल्यु ऑफ चेन'साठी वापरण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, परिषदेचे प्रास्ताविक बॉम्बे चेंबरचे व्यवस्थापक विजय श्रीरंगन यांनी केले. जैन इरिगेशनचे डॉ. डी. एन. कुलकर्णी यांनी कृषी पूरक उत्पादनातील अडचणींचा आढावा घेतला. उद्घाटन सत्रानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे डॉ. चंद्रा यांनी दिली. दरम्यान, दुपारच्या सत्रात परिसंवाद झाले.



नाशिक येथे आयोजित परिषदेचे उद्घाटन डॉ. रमेश चंद्र. समवेत इतर.

### कृषिमालास योग्य भाव देण्याचा प्रश्न

देशासमोर आज शेती उत्पादन वाढविण्याऐवजी त्या उत्पादनाला योग्य भाव कसा मिळवून द्यायचा असा प्रश्न आहे. यासाठी निती आयोग वेगवेगळ्या टप्प्यांवर काम करत आहे. जीवनावश्यक वस्तू कायद्यात बदल करताना शेतमालाला योग्य बाजार भाव मिळावा यासाठी अर्थ व्यवस्थापन गरजेचे आहे. विपणनाचे नवे तंत्र आत्मसात केल्यास परिस्थिती बदलू शकते. महाराष्ट्रात त्या दृष्टीने पोषक वातावरण असून मुख्यमंत्र्यांनी उद्योगास तशी मुभा दिली आहे. वेअर हाऊसमधील भ्रष्टाचारावर नियंत्रण यावे यासाठी ई-पावती अनिवार्य करण्यात यावी, फ्युचर ट्रेडिंगवर काम करताना किमती कशा नियंत्रणात राहतील यावर काम होणे गरजेचे असल्याचे चंद्रा यांनी सूचित केले.

# उत्पादनांची नव्हे, दराची चिंता

## ॲग्रिकॉर्प परिषदेत डॉ. रमेश चंद यांचे स्पष्टीकरण

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

देशात कृषी उत्पादनाच्या उद्दिष्टाची चिंता नाही तर कृषी मालाला भाव कसा चांगले मिळेल, याची चिंता असल्याचे निती आयोगाचे सदस्य डॉ. रमेश चंद यांनी व्यक्त केली.

आंबड येथील द ताज गेट वे हॉटेल येथे बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिजच्या ॲग्रिकॉर्प-२०१७ या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत निती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चंद यांनी मार्गदर्शन केले. बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिजचे महासंचालक विजय श्रीरंगन, सहसंचालक एस. जयकुमार, समिती सदस्य राजन राजे, एस. के. गोयल आणि समिती सदस्य चेतन डेढिया उपस्थित होते.

देशांतर्गत शेतमालाच्या उत्पादनाला आणि व्यापाराला एक ठोस दिशा देण्याची गरज असून, शेतमालाच्या किमतीचा प्रश्न गांभीर्याने सोडवण्याची गरज आहे. त्यासाठी प्रचलित बाजारव्यवस्थेत बदलत्या काळानुरूप बदल करणे गरजेचे आहे. प्रचलित बाजारव्यवस्थेचे आयुष्य आता संपले असून, सध्याचा जमाना मॉडर्न व्हॅल्यू चेनचा आहे. व्हॅल्यू चेन अर्थात मूल्यवर्धित सेवांच्या शृंखलेचा आहे. आणि तसेच बदल बाजारव्यवस्थेत गरजेचे असल्याचेही डॉ. रमेश चंद म्हणाले.

डॉ. चंद यांनी या परिषदेतून कृषी मालाला चांगला भाव मिळेल यासाठी रोड मॅप देण्याचे आवाहनही केले. हा रोड मॅपवर निती आयोगात चर्चा




### राज्याच्या कृषी धोरणाचे कौतुक



राज्यात मॉडर्न कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यात बदल करण्यात महाराष्ट्र अग्रेसर राहिला येथे खासगी बाजार समिती सुरू झाल्याचेही त्यांनी सांगितले. इतर राज्यापेक्षा महाराष्ट्राचे कृषी धोरण व कामाची पध्दत इतर राज्यापेक्षा चांगली आहे. येथे सहकार चळवळीची त्याला बळकटी असल्याचे ते म्हणाले. या परिषदेला दोन दिवसात ३१ तज्ज्ञ उपस्थित राहणार आहे.

### आज चर्चासत्र

दोन दिवसीय परिषदेत शुक्रवारी पाच विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. त्यात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ सहभाग घेणार आहे. उद्घाटन सोहळा व चर्चासत्र संपल्यानंतर सर्व उपस्थितांनी यांनी मोहाडी येथील सह्याद्री ॲग्रो फार्मला भेट दिली.

असेही त्यांनी स्पष्ट केले. आपल्याकडे शेतमालाच्या किमती प्रत्येक राज्यानुसार बदलताना दिसतात. किमतीतील हा बदल कशामुळे निर्माण होतो, याचाही विचार होणे आवश्यक आहे. बाजार समिती कायद्यात सुधारणांचा निर्णय राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आला. परंतु या सुधारणा काही राज्यांमध्ये अंमलात आल्या नाहीत.

काही राज्यांमध्ये या सूचनांच्या अंमलबजावणीकडेही म्हणावे तसे लक्ष दिले गेले नाही. शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत महाराष्ट्र नेहमी अग्रेसर राहत आला आहे. महाग्रीन, महाग्रेप, सह्याद्री फार्मिंग, जैन इरिगेशन असे

असे प्रयत्न व्यापक स्वरूपात होणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

### परिषदेचा उद्देश

या परिषदेत बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिजतर्फे संचालक विजय श्रीरंगन यांनी स्वागत करताना परिषद घेण्यामागील उद्देशही स्पष्ट केले. कृषी क्षेत्रातील उत्पादकांपासून सर्वच घटकांच्या प्रगतीसाठी एक सक्षम मूल्य शृंखला (व्हॅल्यू चेन) तयार करणे, या शृंखलेमध्ये अधिकाधिक गुंतवणूक व्हावी यासाठी मार्ग सुचविणे, उत्पादकांची माहिती देणे, त्याचप्रमाणे

व मध्यम संस्था, कॉर्पोरेट कंपन्या, बँका, वित्तसंस्था, आणि राज्य व केंद्र सरकारचे प्रतिनिधी यांना एकत्र आणण्यासाठी एकच व्यासपीठ तयार करणे हे या मागील उद्दिष्ट आहे. जैन इरिगेशनचे डॉ. डी. एन. कुलकर्णी यांनी या परिषदेचे महत्त्व सांगितले. ईपीसी इंडस्ट्रीजचे संजीव मोहिते यांनी प्रेझेंटेशन सादर केले.

राज्य सरकारच्या कृषी विभागाचे सचिव डॉ. एस. के. गोयल, निवेम फोन्सुरलचे सीईओ रंजन राजे, सह्याद्रीचे विलास शिंदे, महाफेडचे योगेश थोरात, नाबार्डचे डॉ. यू. एस. सहा, वरुण ॲग्रोच्या मॅनेजिंग डायरेक्टर मनिष

# करार शेती धोरण पंधरा दिवसांत

Tushar.Pawar
@timesgroup.com
Tweet : @ tusharpawarTOI

नाशिक : शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी करार शेतीबाबतचे धोरण निती आयोगाने तयार केले असून, येत्या पंधरा दिवसांत ते राज्यांना सादर केले जाईल, अशी माहिती निती आयोगाचे सदस्य रमेश चंद यांनी दिली. कृषी क्षेत्रात महाराष्ट्राने केलेल्या कामगिरीचेही त्यांनी कौतुक केले. महाराष्ट्राने कृषी क्षेत्रातील मार्केटिंग, करार शेती आणि संशोधनात चांगले काम केले असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

देशाच्या व्यापार धोरणात लवकरच काही महत्त्वाचे बदल केले जाणार असल्याचे सूतोवाच चंद यांनी केले. प्रामुख्याने आयात-निर्यातीसंदर्भातील निकषांचा विचार हे धोरण आखताना केला जात असल्याचे ते म्हणाले.

केंद्रीय अर्थमंत्रालयाने आपल्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली आहे. ही समिती फ्युचर ट्रेडिंग तसेच पिकांच्या भविष्यातील किमती आधीच ठरवता येतील काय, याविषयीच्या शक्यतांचा अभ्यास करणार असल्याची माहितीही चंद यांनी दिली. सध्या देशातील मोठ्या शहरांमध्ये चांगल्या शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या आहेत. त्याचा लाभ घेऊन शेतकऱ्यांनी त्यांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी गावाबाहेर पाठवावे, असा सल्लाही चंद यांनी दिला.

### २५ हजार कोटींची तरतूद

राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत कृषी क्षेत्रासाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यात केंद्र सरकारचा वाटा १५ हजार कोटी, तर राज्य सरकारांचा वाटा १० हजार कोटींचा असेल. येत्या तीन वर्षांत कृषी क्षेत्रात हा पैसा ओतला जाईल. तसेच यापैकी २० टक्के रक्कम व्हॅल्यू चेन अर्थात मूल्यवर्धित सेवांवर खर्च केली जाणार असल्याची माहिती चंद यांनी दिली.



# शेतीच्या विकासात 'व्हॅल्यू चेन'ची भूमिका महत्त्वाची



। नाशिक।

देशांतर्गत शेतमालाच्या उत्पादनाला आणि व्यापाराला एक ठोस दिशा देण्याची गरज असून शेतमालाच्या किमतीचा प्रश्न गांभीर्याने सोडवण्याची गरज आहे, असे मनोगत नीती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चांद यांनी आज येथे व्यक्त केले.

चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या 'ॲग्रीकॉर्प - २०१७' या दोन दिवसीय परिषदेला नाशिकमध्ये प्रारंभ झाला. या परिषदेत नीती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चांद यांच्या मार्गदर्शनाकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे महासंचालक विजय श्रीरंगन, सहसंचालक एस. जयकुमार, समिती सदस्य राजन राजे, एस. के. गोयल आणि समिती सदस्य चेतन हेडिया यांच्या पुढाकाराने या परिषदेचं यशस्वी आयोजन झालं.

या परिषदेच्या पहिल्या सत्रात शेतमालाच्या किमतीचा विषय चर्चेत होता. त्याचाच आधार घेत रमेश चांद यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. ते म्हणाले, 'आज आपल्या देशात शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. त्या दृष्टीने प्रचलित बाजारव्यवस्थेत बदल गरजेचा आहे. कोणतीही व्यवस्था कायमस्वरूपी रहात नाही. त्यात बदलत्या काळानुरूप योग्य बदल गरजेचे असतात. हीच बाब बाजारव्यवस्थेलाही लागू होते. थोडक्यात, प्रचलित बाजारव्यवस्थेचं आयुष्य आता संपलं असून सध्याचा जमाना मॉडर्न 'व्हॅल्यू चेन'चा अर्थात 'मूल्यवर्धित सेवांच्या शृंखले'चा आहे आणि तसेच बदल बाजारव्यवस्थेत गरजेचे आहेत.'

चांद पुढे म्हणाले, 'आपल्याकडे शेतमालाच्या किमती प्रत्येक राज्यानुसार बदलताना दिसतात. किमतीतील हा बदल कशामुळे निर्माण होतो याचाही विचार होणं आवश्यक आहे.

आपल्या देशात आर्थिक सुधारणांना सुरुवात होऊन पंचवीस वर्षांचा कालावधी लोटला आहे. मात्र शेतीक्षेत्र अजूनही आर्थिक सुधारणांपासून वंचित आहे. याचं कारण या क्षेत्रात आर्थिक विकासाला गती मिळालेली नाही. मुख्य म्हणजे शेतीक्षेत्रातील सुधारणा हा विषय राज्यांचा की केंद्राचा असा संघर्ष नेहमीच पहायला मिळतो. वास्तविक, या विषयावर राष्ट्रीय धोरण आणि त्याला सर्व राज्यांची सहमती या बाबी आवश्यक ठरतात. त्या दृष्टीने बाजार समिती कायद्यात सुधारणांचा निर्णय राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आला. परंतु या सुधारणा काही राज्यांमध्ये अंमलात आल्या नाहीत.

काही राज्यांमध्ये या सुधारणांच्या अंमलबजावणीकडेही म्हणावं तसं लक्ष दिलं गेलं नाही. अर्थात बाजार समिती कायद्यातील सुधारणांच्या दृष्टीने महाराष्ट्रानं काही महत्त्वाची पावलं टाकली आहेत. त्यानुसार शेतमाल बाजार समितीमध्ये न्यायचा की परस्पर विकायचा हे ठरवण्याचा अधिकार शेतकऱ्यांकडे आला आहे. असाच पद्धतीचं धोरण विविध राज्यांमध्ये अस्तित्वात येणं गरजेचं आहे. आणखी एक बाब म्हणजे शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत महाराष्ट्र नेहमी अग्रेसर रहात आला आहे. महाग्रेप्स, महाऑरेंज, सह्याद्री फार्मिंग, जैन इरिगेशन अशी काही उदाहरणं यासंदर्भात देता येतील. असे प्रयत्न व्यापक स्वरूपात होणं ही काळाची गरज आहे.'

परिषदेच्या पहिल्या सत्रात डॉ. डी. एन. कुलकर्णी, श्री. संजीव मोहोनी यांचंही मार्गदर्शन लाभलं. या पहिल्या सत्राला मान्यवर तसेच कृषी व्यावसायिकांचा चांगलाच सहभाग लाभला.